

कुंडल येथील क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये आयोजित स्वागत समारंभामध्ये बोलताना कवि रमजान मुल्ला.

# 'क्रांती' महाविद्यालयामध्ये स्वागत समारंभ उत्साहात

केसरी वृत्तसेवा

कुंडल : येथील क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कवि रमजान मुल्ला तर अध्यक्षस्थानी जि. प. सदस्य तथा गटनेते शरद लाड हे होते.

स्व. क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या प्रतिमेला अभिवादन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी कवि रमजान मुल्ला यांच्या काव्यवाचनाने उपस्थित विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या आई या कवितेने उपस्थितांच्या काळजाचा ठाव घेतला. जि. प. सदस्य शरद लाड यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्याकडे गांभिर्याने पाहून या वयात करियरकडे लक्ष द्या असे सांगितले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी केले. परीचय प्रा. गणेश खारगे यांनी, सुत्रसंचलन प्रा. एस. बी. लाड तर आभार प्रा. पी. डी. कांबळे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दै. केसरी २/१/२२

दै. केसरी - 02/01/2022



कुंडल : येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये आयोजित स्वागत समारंभामध्ये बोलताना कवि रमजान मुल्ला. यावेळी शरद लाड, प्राचार्य डॉ. प्रताप लाड.

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

कुंडल : पुढारी वृत्तसेवा, येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ उत्साहात झाला. प्रमुख पाहुणे म्हणून कवि रमजान मुल्ला तर अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य शरद लाड हे होते. यावेळी कवी रमजान मुल्ला यांच्या काव्यवाचनाने उपस्थित विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. जिल्हा परिषद सदस्य शरद लाड यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्याकडे गांभियनि पाहून करिअरकडे लक्ष द्या, असे सांगितले. प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. गणेश खारगे यांनी परिचय करून दिला. प्रा. एस. बी. लाड यांनी सुत्रसंचलन केले. प्रा. पी. डी. कांबळे यांनी आभार मानले. दै. पुढारी 2/1/2022

दै. पुढारी दि. 02/01/2022